MHLC280000852025

दाखल दिनांक : १६/०७/२०२५
नोंदणी दिनांक : १६/०७/२०२५
निकाल दिनांक : ०६/०३/२०२६
कालावधी : ०० वर्ष ०७ म. १८ दि.

**कामगार न्यायालय, बुलढाणा.**
**(श्री. शार्दुल श. जहागिरदार, न्यायाधीश)**

**निशाणी ओ—**

**अर्ज (औ.वि.का.) क्रं. ०५/२०२५**

**एजाज अहमद शेख चॉद**
वय :— ६० वर्षे, धंदा :— सेवानिवृत्त,
ता. गवळी पुरा, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा. .. **अर्जदार**

**विरुध्द**

**विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मलकापुर रोड, बुलढाणा, ता.जि. बुलढाणा. .. **प्रतिवादी**

**अर्ज — औद्योगिक विवाद कायदा, १९४७ कलम ३३ सी (२) नुसार.**

**विधिज्ञ :—** श्री. जि. आर. गावंडे, अर्जदाराकरीता.
श्री. आर. एम. काशीकर, प्रतिवादीकरीता.

**<u>निकालपत्र</u>**

**(पारीत दिनांक ०६/०३/२०२६)**

१) एजाज अहमद शेख चॉद हयांनी अर्जदार हया नात्याने प्रतिवादी म्हणजे विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मलकापुर रोड, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा हयांच्याविरुध्द औद्योगिक विवाद कायदा, १९४७ कलम ३३—सी (२) खाली हा अर्ज दाखल केला असून असे प्रतिपादन केले आहे की, वेतन निश्चिती केल्यानंतर फरकाची रक्कम व्याजासहीत प्रतिवादी हयांनी अर्जदार हयांना प्रदान करावेत या आदेशान्वये हा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) अर्जदार असे म्हणतात की, प्रतिवादी ह्यांच्याकडे मेहकर आगारामध्ये दिनांक २९/०९/१९८७ पासून लिपीक या पदावर कार्यरत होते आणि त्यानंतर अर्जदार ह्यांची बदली विभागिय कार्यालय, बुलढाणा येथे लिपीक या समपदावर झाली. त्यानंतर सन २०११ मध्ये अर्जदाराची वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती झाली आणि परत त्यानंतर सन २०१८ मध्ये अर्जदाराची पदोन्नती आस्थापना पर्यवेक्षक म्हणून आणि त्यानंतर अर्जदार विभागिय वैयक्तिक पर्यवेक्षक या पदावरून वयाचे ५८ वर्षे पुर्ण झाल्यामुळे दि. ३१/१२/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाले.

३) अर्जदार पुढे असे म्हणतात कि, ते राज्य परिवहन बुलढाणा येथे दि. २९/०९/१९८७ पासून कामास होते व दि. ३१/१२/२०२२ रोजी त्याची सेवा समाप्त झाली. प्रतिवादींच्या नियमानुसार कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास त्याच्या खात्यात जी रजा शिल्लक असेल त्याचे रोखीकरण करण्याची तरतुद आहे. त्याअनुषंगाने सेवानिवृत्तीच्या वेळेस अर्जदाराचा पगार रू. ५९,८४६/— इतका होता व

त्यानुसार रजा रोखीकरणाचे रू. ६,३९,८९२/— एवढे प्रतिवादी देणे लागत होते, जी न दिल्यामुळे प्रतिवादींविरुध्द या न्यायालयात औद्योगीक विवाद कायदयाखाली अर्ज क्र. ३/२०२३ दाखल करण्यात आला होता आणि त्या प्रकरणात अर्जदारांच्या हक्कात न्यायनिर्णय पारीत झाला.

४) अर्जदार पुढे असे म्हणतात की, विभागीय आस्थापना आदेश ५७/२०२५ नुसार दि. २१/२/२०२५ रोजी प्रतिवादींनी अर्जदारांची त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर वेतन निश्चिती केली, त्यामुळे त्यांचे वेतन ५४,९२७/— आणि महागाई भत्ता ३४ टक्के नुसार १८,६७५/— असे एकुण रु. ७३,६०२/— एवढी रक्कम झाली आणि प्रचलीत सुत्रानुसार ७३,६०२ ÷ २६ = २८३० आणि रजा शिल्लक २७८ दिवस म्हणजेच २८३० × २७८ अशी एकुण रक्कम ७,८६,७४०/— एवढी होते, त्यापैकी प्रतिवादींनी अर्ज क्र. ३/२०२३ मधील पारीत झालेल्या न्यायनिर्णयानुसार अर्जदारांना ६,३९,८९२/— एवढी रक्कम दिलेली आहे म्हणजेच आता ७,८६,७४० — ६,३९,७९२ = १,४६,९४८/— एवढी रक्कम प्रतिवादी देणे लागतात, जी की केवळ सेवानिवृत्ती नंतर वेतन निश्चिती झाल्यामुळे फरकाची म्हणुन ठरते.

५) अर्जदार शेवटी असे म्हणतात की, ही वेतन निश्चीती प्रतिवादींनी दि. २१/२/२९२५ रोजी केलेली आणि त्यामुळे फरकाची रक्कम अनुज्ञेय ठरते आणि म्हणुन प्रतिवादींना असे निर्देशित करण्यात यावे की, त्यांनी अर्जदारांना फरकाची रक्कम रु. १,४६,९४८/— आणि त्यावर दि. २१/२/२०२५ पासुन १० टक्के व्याज व कोर्ट खर्च रु. १०,०००/— दयावेत असे निर्देशित करण्यात येवुन हा अर्ज मंजुर करण्यात यावा.

६) प्रस्तुतचा अर्ज हा पुर्णपणे बेकायदेशीर आणि चुकीचा असल्यामुळे फक्त आणि फक्त फेटाळण्यास पात्र ठरतो असे प्रतिवादीने प्रतिपादन केले असून, त्याकरीता प्रतिवादी हयांनी निशाणी क्रं. सी—३ खाली आपली लेखी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादीं पुढे असे म्हणतात कि, अर्जदार हे वाहक या पदावर नोकरीस होते व दि. ३१/१२/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, अर्जदारांनी अनेक बाबी वि. न्यायालयापासून लपवुन ठेवल्या असून अनेक चुकीची कथने केलेली आहेत. तसेच, अर्जदारांचा अर्ज हा मुदतीत दाखल केलेला नाही त्यामुळे अर्जदारांचा अर्ज प्रतिपालनीय नसल्याने तो खारीज करण्यात यावा.

७) प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, अर्जदारास त्याची एकुण रक्कम अदा केलेली असून अर्जदार ह्यांनी सदर प्रकरण दाखल करण्यापुर्वी व रक्कम प्राप्त करतेवेळी कोणतीही हरकत अथवा तक्रार तसेच दावा कोठेही दाखल केलेला नाही. तसेच, अर्जदारास प्रस्तुतचे प्रकरण औद्योगिक विवाद कायदा चे कलम ३३ सी—२ नुसार दाखल करता येणार नाही. अर्जदाराने सदरचे प्रकरण विलंबाने दाखल केले असून त्याचे कोणतेही कारण नमुद केले नाही. म्हणून प्रतिवादींनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

८) प्रतिवादी शेवटी असे म्हणतात की, मुळातच अर्जदार हे महामंडळाचे कर्मचारी असल्यामुळे त्यांचे मुळ वेतन व महागाई भत्ता मिळुन येणा—या एकुण वेतनाला ३० दिवस भागुन येणा—या संख्येत एकुण रजेचा गुणाकार केला की, रजेची रोख रक्कम निघते. त्यामुळे विभागीय आस्थापना आदेश क्र. ५७/२०२५ नुसार

२१/२/२०२५ रोजी अर्जदारांची वेतननिश्चती केल्यामुळे अर्जदारांचे मुळ वेतन ५४,९२७/— + १८,६७५ (महागाई भत्ता ३४ टकके) = ७३६०२ ÷ ३० = २४,०५३/— ✕ २७८ जी अर्जीत आहे असे मिळुन रु. ६,८१,९३४/— एवढे होतात.

९) प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदारांना या पुर्वी रजा रोखीकरणा पोटी रु. ६,३९,८९२/— एवढी दिलेली आहे. त्यानंतर रु. १९,६८५/— व रु. २२,२६७/— असे एकुण रु. ४१,९५२/— निघणारी रजा रोखीकरणाची रक्कम देण्यात आलेली आहे. त्यामुळे आता रजा रोखीकरणाची कोणतीही रक्कम प्रतिवादींकडे प्रलंबीत नाही. त्याचबरोबर अर्जदारांनी रजा रोखीकरणाची रक्कम काढतांना एकुण वेतन भागिले २६ असे चुकीचे गृहीतक मांडुन न्यायालयाची दिशाभुल करुन जास्तीची व खोटी रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वस्तुत: रोजंदारीवरील कर्मचा—यास एकुण वेतन भागिले २६ हे सुत्र लागु होते तर नियमीत कर्मचा—यास एकुण वेतन भागिले ३० हे सुत्र लागु होते आणि अर्जदार हे प्रतिवादींचे नियमीत कर्मचारी असल्यामुळे त्यांना २६ हे सुत्र लागुच होवु शकत नाही आणि त्यामुळे हा अर्ज पुर्णपणे बेकायदेशीर व चुकीचा ठरतो आणि फक्त आणि फक्त फेटाळण्यास पात्र ठरतो.

१०) प्रस्तूत प्रकरणात निशाणी क्रं.ओ—३ वर खालील मूद्दे निश्चीत करण्यात आलेले आहेत. त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणांसाठी म्हणून देत आहे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हे सिध्द करतात का कि, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा त्यांचा अधिकार | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | आधीच अस्तित्वात (pre-existing right) आहे ? | |
| २) | अर्जदार हे सिध्द करतात का कि, त्यांनी मागितलेल्या दादसाठी ते पात्र ठरतात ? | होकारार्थी. |
| ३) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रं. १ व २ करीता :—**

११) मुद्दा क्रं. १ आणि २ चे अवलोकन करतांना हे स्पष्ट होते की, प्रस्तुतचे प्रकरण अर्जदारांनी प्रतिवादी हयांचे विरुध्द त्यांनी वेतन निश्चिती करण्यात आल्यानंतर फरकाची रक्कम प्रदान न केल्यामुळे दाखल केलेले आहे आणि त्यावर प्रतिवादी ह्यांचे असे कथन आणि युक्तिवाद असा आहे की, मुळातच अर्जदारांना रजा रोखीकरणाची सर्व रक्कम प्रदान केल्यामुळे आणि अर्जदारांनी चुकीचे गृहीतक मांडुन चुकीचा हिशोब केलेला आहे ज्यामुळे प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

१२) अर्जदार आणि प्रतिवादी ह्यांचे परस्परविरोधी कथनाच्या अनुषंगाने दोन्ही पक्षांनी अभिलेखावर दाखल केलेल्या पुराव्याचे स्वतंत्रपणे अवलोकन करणे आवश्यक ठरते.

अर्जदारांचा पुरावा :—

**१. निशाणी यु—७ खाली विभागीय आस्थापना आदेश क्र. ५७/२०२५**

२. **निशाणी यु—८ खाली दि. २७/१/२०२५ रोजी अर्जदारांनी प्रतिवादींना मागणी केलेले पत्र**

३. **निशाणी यु—९ खाली दि. ५/२/२०२५ रोजी अर्जदारांनी मागणी केलेले पत्र**

४. **निशाणी यु—१० खाली दि. ८/७/२०२५ रोजी अर्जदारांनी मुळ वेतन वाढल्यामुळे वेतनातील फरक मिळण्याकरीता पाठविलेले पत्र**

<u>प्रतिवादींचा पुरावा</u>

**१) साक्षीदार भगवान कचरुजी मांडवे ह्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि. क्रं. सी—४**

१३) अर्जदार असा युक्तिवाद करतात की, मुळातच प्रतिवादी आपल्या लेखी कैफीयत मधुन असे कथन करतात की, अर्जदारांना रजा रोखीकरणाची सर्व रक्कम देण्यात आलेली आहे आणि अर्जदारांनी चुकीचे सुत्र वापरलेले आहे. परंतु मुळातच हा अर्ज अर्जदारांनी रजा रोखीकरण रक्कमेसंदर्भात दाखलच केलेला नसुन, सेवानिवृत्ती नंतर अर्जदारांची वेतन निश्चिती करण्यात आली त्यामुळे वेतनातील जो फरक ती रक्कम प्रतिवादी देण्यास जबाबदार असल्यामुळे त्यांच्याकडे मागण्यात आलेली आहे. प्रतिवादींनी अर्जदारांना या न्यायालयाने अर्ज क्र. (औ.वि.का.) ३/२०२३ यामध्ये पारीत झालेल्या न्यायनिर्णयानुसार रजा रोखीकरण रक्कम रु. ६,३९,८९२/— ही प्रदान केलेली आहे.

१४) त्याअनुषंगाने आता अर्जदार प्रस्तुतच्या अर्जातुन वेतन फरकातील रक्कम जी प्रतिवादी हयांच्या दि. २१/०२/२०२५ रोजीच्या

विभागीय आस्थापना आदेश क्र. ५७/२०२५ मुळे अनुज्ञेय ठरतात असा युक्तीवाद करुन, नि.क्र. यु—७ खाली दाखल केलेल्या या आदेशाकडे लक्ष वेधतात. तर प्रतिवादी हयांचा युक्तीवाद आणि कथन असे आहे की, मुळातच अर्जदारांनी जी रक्कम मागितलेली आहे ती कोणत्याही ठोस गृहीतकावर आधारीत नाही वा त्याला कोणताही ठोस पुरावा नाही. अर्जदारांची मागणी पुर्णपणे चुकीची आहे. अर्जदार आपल्या अर्जातुन जे सुत्र म्हणतात आणि २६ दिवसांचा दाखला देतात, प्रत्यक्षात ३० दिवस हे सुत्र रजा रोखीकरणाच्या संदर्भात वापरले जाते.

१५) या प्रकरणात अर्जदार आणि प्रतिवादी हयांच्यामध्ये जो वाद आहे तो रक्कम मिळण्यास पात्र वा अपात्र आणि अंतीम वेतनावर सुत्र २६ दिवसांचे का ३० दिवसांचे या मुदद्याभोवतीच आहे. अर्जदार आपल्या अर्जातुन २६ दिवसांचा सुत्राचा वापर करुन वेतन फरकातील रक्कम मागतात तर प्रतिवादी आपल्या लेखी कैफीयत मधुन ३० दिवसांच्या सुत्राचा संदर्भ देवुन रक्कम मिळण्यास पात्र नाही हे स्पष्ट करतात. अर्जदार आणि प्रतिवादी या दोन्ही पक्षांच्या युक्तीवाद आणि त्यांनी दाखल केलेला पुरावा याचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, अर्जदार आणि प्रतिवादी या दोन्ही पक्षातील कथनामध्ये अर्जदाराचे कथन कायदेशीर दृष्टया खालील तिन कारणांमुळे उजवे ठरते :

**१. अर्जदारांचा युक्तीवाद अर्ज (औ.वि.का.) ३/२०२३ च्या अनुषंगाने सारखाच, त्यातील निकष प्रस्तुतच्या प्रकरणाला सुध्दा**

**२. प्रतिवादींना आपल्या लेखी कैफीयत मधील कथन पुराव्यानिशी सिध्द करण्यात आलेले अपयश, आणि**

**३. कायदयातील (Law of Estoppel) चे तत्व म्हणजेच प्रतिबंधाचा नियम जो या प्रकरणात प्रतिवादींच्या विरुध्द तंतोतंत लागु होतो.**

**१. अर्जदारांचा युक्तीवाद अर्ज (औ.वि.का.) ३/२०२३ च्या अनुषंगाने सारखाच, त्यातील निकष प्रस्तुतच्या प्रकरणाला सुध्दा :**

अर्जदार एजाज अहमद शेख चॉद हयांनी या पुर्वीही प्रतिवादी म्हणजेच विभाग नियंत्रक म.रा. परिवहन महामंडळ, बुलढाणा हयांचेविरुध्द अर्ज (औ.वि.का.) ३/२०२३ हे प्रकरण या न्यायालयात दाखल केलेले, ज्यामध्ये दोन्ही पक्षांचा पुरावा झाल्यानंतर न्यायनिर्णय पारीत होवुन अर्जदारांना रक्कम रु. ६,३९,८९२/— रजा रोखीकरणा संदर्भात प्रतिवादींनी दयावेत असे निर्देशित करण्यात आल्यानंतर प्रतिवादींनी ती रक्कम अर्जदारांना दिली. या प्रकरणात अर्जदारांनी जेव्हा त्यांची रजा रोखीकरण २७८ दिवसांचे बाकी आहे हे सिध्द केले होते त्यावेळी देखील २६ हे सुत्रच वापरले होते आणि त्यावेळी देखील हेच प्रतिवादी होते ज्यांनी नंतर अर्जदारांना उपरोक्त रजा रोखीकरणाची रक्कम प्रदान केली. त्यामुळे आता या प्रकरणात प्रतिवादी हयांचे जे कथन आणि युक्तीवाद आहे की, २६ दिवसांचे सुत्र लागुच होत नाही ते ३० दिवसांचे लागु होते त्याच्यात कोणतेही गुण आणि तथ्य आढळुन येत नाही.

त्याचे कारण असे की, सध्याच्या प्रकरणात अर्जदार त्यांची वेतन निश्चिती त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर प्रतिवादींनी केल्यामुळे वेतनातील फरक एवढा मागत आहेत, आणि मागील प्रकरणात अर्जदारांनी रजा रोखीकरणाची रक्कम जेव्हा प्रतिवादींकडे मागितली त्यावेळी जे सुत्र प्रतिवादींविरुध्द वापरले, या ही प्रकरणात त्याच सुत्राचा अंगीकार अर्जदारांनी केला, फरक एवढाच आहे की, त्यावेळी रजा रोखीकरण रक्कम ही होती आज वेतन निश्चिती करण्यात आल्यानंतर अनुज्ञेय असणारी फरकाची रक्कम अर्जदार मागत आहेत आणि ते सुध्दा त्याच

प्रतिवादींविरुध्द. त्यामुळे प्रतिवादींच्या या युक्तीवादात कोणतेही तथ्य आढळत नाही की, मागितलेली रक्कम मिळण्याकरीता अर्जदार पात्र नाहीत.

## २. प्रतिवादींना आपल्या लेखी कैफीयत मधील कथन पुराव्यानिशी सिध्द करण्यात आलेले अपयश :

प्रतिवादी आपल्या लेखी कैफीयतमधुन असे कथन करतात की, अर्जदारांनी जी रक्कम मागितलेली आहे ती मागतांना मुळ वेतन, महागाई भत्ता हयांना २६ ने भागितलेले आहे. प्रत्यक्षात महामंडळामध्ये ३० म्हणजे एका महिन्याचे दिवस गृहीत धरावे लागतात, तसा नियम आहे आणि त्यामुळे अर्जदार आता जी रक्कम मागत आहेत ती मिळण्यास पात्रच ठरत नाहीत, कारण २६ हे सुत्र जे रोजंदारीवरील कर्मचारी असतात त्यांना लागु होते आणि **नियमीत कर्मचा—यास ३० हे सुत्र लागु होते** आणि अर्जदार यांचा समावेश रोजदारीवरील कर्मचारी म्हणुन नव्हता तर ते नियमीत कर्मचारी म्हणुन कार्यरत होते. परंतु, प्रतिवादी ही बाब पुराव्यानिशी सिध्दच करु शकले नाहीत. त्यामुळे जरी लेखी कैफीयत मध्ये तसे कथन नमुद केलेले असले तरी सुध्दा त्याच्या समर्थनार्थ अभिलेखावर पुरावा दाखल करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे होते.

१६) प्रतिवादींनी नि.क्र. सी—४ खाली भगवान कचरुजी मांडवे हयांचे शपथपत्र दाखल केलेले आहे, ते साक्षीदार उलटतपासणीमध्ये अर्जदारांना पुढीलप्रमाणे मान्यता देतात :

**माझे शपथपत्रामध्ये मी जे नमुद केले आहे की, अर्जदारांचे मुळ वेतन व महागाई भत्ता मिळुन येणा—या एकुण वेतनाला ३० दिवस भागुन येणा—या संख्येत रजेचा गुणाकार केला की रोख रक्कम निघते या कथनाच्या समर्थनार्थ महामंडळाचे परिपत्रक/आदेश, सुचना दखल केलेले नाहीत.**

१७) प्रतिवादींच्या साक्षीदारांच्या उलटतपासणीमधील उपरोक्त मान्यतेमुळे हे स्पष्ट होते की, जरी प्रतिवादी आपल्या लेखी कैफीयत मधुन असे नमुद करत असले की अर्जदारांना २६ हे सुत्र लागु होत नाही आणि ३० हे सुत्र लागु होते, तरी ही बाब पुराव्यानिशी सिध्द करण्यात प्रतिवादींना पुर्णपणे अपयश आलेले आहे. साक्षीदार जे महामंडळात लेखाकार आहेत म्हणजे ज्यांच्याकडे वेतन, रजा रोखीकरण, उपदान, वेतन फरकाची रक्कम ही कर्तव्य असतात तेच साक्षीदार उलटतपासणीमध्ये हे मान्य करतात की, अर्जदारांना ३० दिवसाचे सुत्र लागु होते, या कथनाच्या समर्थनार्थ महामंडळाचे परिपत्रक / आदेश / सुचना दाखल केलेल्या नाहीत, ज्यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादी हे कशाच्या आधारावर असे कथन करतात की, अर्जदार हे मागितलेल्या रक्कमेसाठी पात्र नाहीत कारण त्यांना २६ दिवसांचे सुत्र लागु न होता ३० दिवसांचे लागु होते आणि त्यामुळेच प्रतिवादींना हे सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आले आहे की, अर्जदार मागितलेल्या रक्कमेकरीता पात्र नाहीत.

**३. कायदयातील (Law of Estoppel) चे तत्व म्हणजेच प्रतिबंधाचा नियम जो या प्रकरणात प्रतिवादींच्या विरुध्द तंतोतंत लागु होतो :**

या प्रकरणाला कायदयातील उपरोक्त तत्वाचा पुर्णपणे निकष लागु करता येतो आणि होतो देखील, त्याचे कारण असे की, याच

अर्जदारांनी याच प्रतिवादींविरुध्द जेव्हा रजा रोखीकरणाची रक्कम मागणी करतांना एकुण वेतनाला २६ दिवसांचे सुत्र लावले आणि जी रक्कम तयार झाली तीच रक्कम अर्जदारांच्या हक्कामध्ये न्यायनिर्णय पारीत झाल्यानंतर प्रतिवादींनी अर्जदारांना प्रदान केली, ही बाब प्रतिवादींना देखील मान्य आहे. जर प्रतिवादी रजा रोखीकरणाची रक्कम जे अंतिम वेतन आणि महागाई भत्ता हयांच्या अनुषंगाने जमा असलेल्या रजा या अनुषंगाने अर्जदारांनी गृहीतक मांडल्यानंतर प्रदान करतात, तर सेवानिवृत्ती नंतर वेतन निश्चिती करण्यात आल्यामुळे अंतिम वेतन आणि महागाई भत्ता यावर परत त्याच सुत्राने प्रदान करण्यात काय अडचण आहे हे कोणत्याही प्रकारे स्पष्ट करु शकत नाहीत.

१८) उलटतपक्षी अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यातुन हे पुर्णपणे सिध्द केले आहे की, त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा मुलभुत अधिकार असुन त्यांनी मागितलेल्या दाद मिळणेकरीता ते पुर्णपणे पात्र आहेत त्यामुळे मुद्दा क्रं. १ व २ हे होकारार्थी ठरत असून खालील आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे :—

## <u>आदेश</u>

१) अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी ह्यांना असे निर्देशीत करण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदार ह्यांना वेतन निश्चिती फरकाची रक्कम रू. १,०४,८९६/— आणि त्यावर दिनांक २१/०२/२०२५ १० टक्के व्याज या न्यायनिर्णयाची प्रत प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाचे आत प्रदान करावी.

३) दोन्ही पक्षांनी आप आपला खर्च सोसावा.

४) प्रकरणाची नस्ती बंद करण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.03.09 11:25:58 +0530

**दिनांक :— ०६/०३/२०२६** **(शार्दुल श. जहागिरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :— बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**

युक्तीवाद ऐकल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
श्रुतलेखन दिल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
टंकलिखीत केल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
निकालपत्र तपासणी आणि स्वाक्षरी दि. :— ०६/०३/२०२६